जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५१४ दिनांक - ०६/१२/२०२४**

लष्कर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## सराईत घरफोडी करणारा टोळीप्रमुखास त्याचे साथीदारांसह अटक

लष्कर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर २७७/२०२४, भा. न्या. सं.कलम ३०५, ३३१(२), ३३१(४) ३(५) मधील फिर्यादी रा. कोंढवा, पुणे यांचे मालकीचे सेल एक्स्प्रेस या नावाचे मोबाईल विक्रीचे दुकान मरियम मंझिल, न्यु मोदिखाना कॅम्प, पुणे या ठिकाणी असुन, सदर दुकान दि. ०३/१२/२०२४ रोजी रात्रौ दरम्यान बंद असताना दुकानाचे शटर उचकटुन अज्ञात चोरट्यांनी घर फोडी करून दुकानातील वनप्लस व ओपो कंपनीचे एकुण १० मोबाईल किंमत रूपये ४४,०००/- असा माल घरफोडी चोरी करून चोरून नेला आहे, प्रस्तुत प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरूध्द दि. ०३/१२/२०२४ रोजी लष्कर पो. स्टे. येथे वर उल्लेखीत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घरफोडी चोरी करणारे गुन्हेगारांबद्दल कोणतीही माहिती उपलब्ध नसताना, वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली लष्कर पो. ठाणे कडील तपास पथकाचे पो अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळावरील तसेच आजुबाजुचे परिसरातील सी सी टि व्ही फुटेज पडताळुन पाहणी केली असता, तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या माध्यमातुन मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपींचा शोध घेण्यास सुरूवात केली, व अथक प्रयत्नाने सापळा रचुन गुन्ह्यातील आरोपी यांना पकडण्यात आले असुन त्यांना गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे, सदर आरोपींची नावे **१) शाहरूख सलाउद्यीन खतीब, वय २४ वर्ष, रा. घर क्र. २०४, गल्ली क्र. २५, भाग्योदय नगर, किर्ती इमारतीसमोर, कोंढवा, पुणे, २) सलिम हसन शेख, वय २४ वर्ष, रा. शेख अब्दुल रेहमान चौक, कासेवाडी, भवानीपेठ, पुणे, ३) सर्फराज पाशा शेख, वय २२ वर्ष, रा. शेख अब्दुल रेहमान चौक, कासेवाडी, भवानीपेठ, पुणे, ४) अजीम बबलु शेख, वय २० वर्ष, रा. भगवा चौक, कासेवाडी, भवानीपेठ, पुणे,** अशी असुन ते आरोपी शहारूख खतीब हा पोलीसा अभिलेखावरील घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार असल्याची माहिती प्राप्त झाली असुन त्याचेवर एकुण ०५ घरफोडी चोरीचे गुन्हे दाखल आहेत.आरोपींकडुन लष्कर पो. स्टे कडील दाखल गुन्ह्यातील एकुण ४४,०००/- रू. किंमतीचे वन प्लस व ओपो कंपनीचे एकुण १० मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. गुन्ह्याचा तपास पोलीस उप-निरिक्षक राहुल घाडगे, हे करीत आहेत.

उपरोक्त कामगीरी ही मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा. पोलीस आयुक्त लष्कर विभाग, श्री. दिपक निकम, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.गिरिषकुमार दिघावकर, पोलीस निरिक्षक(गुन्हे) श्री. प्रदिप पवार, पोलीस उप निरिक्षक राहुल घाडगे, यांचे नेतृत्वाखाली, तपास पथकातील पोलीस अंमलदार महेश कदम, सोमनाथ बनसोडे, संदिप उकिर्डे, रमेश चौधर, सचिन मांजरे, लोकेश कदम,. हराळ, कोडिलकर, महिला पोलीस अंमलदार अल्का ब्राम्हणे, यांनी केलेली आहे.


पोलीस स्टेशन
लष्कर
POLICE STATION
CANTONMENT
लष्कर पोलीस ठाणे पुणे शहर.
तपास पथक